रे. फौजदारी खटला क्र. **३०८/२०२२**
सरकार विरूद्ध किशोर सुरतकर व
अन्य एक
**निशाणी ३२**

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. १ ची जबानी**

सत्यप्रतिज्ञेवर कथन करतो/करते की,
माझे नाव : गजानन पांडुरंग भांडे,
वय : ५६ वर्षे,
धंदा : शेत मजुर,
राहणार : दहिहांडा, ता. अकोट, जि. अकोला.

**सरतपासणी — अभियोगपक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्री. ए. ओ. गाडेकर यांचेमार्फत —**

मी आरोपींना ओळखत नाही. दहिहांडा पोलीसांनी मला पंचनाम्यासाठी बोलाविले नव्हते. माझे समक्ष पंचनाम्याची लिखापढी झाली नाही. मी दोन पंचनाम्यांवर सह्या केल्या होत्या. आता मला घटनास्थळ व जप्ती पंचनामे दाखवले. त्यावर माझ्या पंच साक्षीदार म्हणुन सह्या आहेत. परंतु मला त्यातील मजकूर माहिती नाही.

(***साक्षीदार पुर्वीच्या जबाबाशी विसंगत कथन करीत असल्यामुळे सहा. सरकारी अभियोक्ता यांनी सदर साक्षीदारास भारतीय पुरावा कायदा कलम १५४ नुसार उत्तर सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. परवानगी दिली***.)

२. दहिहांडा गावातील मातंग पुरा कडे जाणा—या रस्त्यावरील अयात खानचे घर मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, मला दहिहांडा पोलीसांनी मातंग पुराकडे जाणा—या रस्त्यावरील अयात खानचे घराजवळ पंचनाम्यासाठी बोलाविले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्याठिकाणी पोलीसांनी माझे समक्ष घटनास्थळ व जप्ती पंचनामे तयार केले आणि मी ते वाचून त्याठिकाणी त्यावर सह्या केल्या होत्या. हे म्हणणे खरे आहे की, दहिहांडा गावातुन दर्यापुर कडे जाणारा रोड आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर रोडवर दक्षिणेकडे लाल शाह याचे किराणा दुकान आहे. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी माझे समक्ष आरोपी क्र. १ याचे ताब्यातुन ट्रक्टर क्र. एम.एच ३२ पी ३१२४ व ट्रॉली क्र. एम. एच. ४० ८७८३ हे जप्त केले होते. हे म्हणणे

खरे नाही की, वर प्रमाणे वाहने पोलीसांनी माझे समक्ष जप्त केली व तसे पंचनामे माझे समक्ष तयार केले होते. हे म्हणणे खरे नाही की, सदर वेळी माझे सोबत गोपाल जानराव खंडारे हा देखील उपस्थित होता. मला थोडेफार लिहिता वाचता येते. हे म्हणणे खरे नाही की, मी वाचून घटनास्थळ व जप्ती पंचनामा यावर सह्या केल्या होत्या. मला माझ्या सहीचे महत्त्व कळते. हे म्हणणे खरे आहे की, मी कोणत्याही कागदावर अनभिज्ञपणे सही करत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीला वाचवण्यासाठी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपासणी** — आरोपी क्र. १ तर्फे ॲडव्होकेट श्री. एफ. ए. काझी व आरोपी क्र. २ तर्फे श्री जी. के. टिकार यांनी नाकारली.

**फेरतपासणी** — काही नाही.

समक्ष व श्रवणोत्तर स्वीकृत.

**स्वा/—**
(ए.ए. माळी)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, अकोट
ता. आकोट, जि. अकोला.

दि. २३.०४.२०२५
अकोट

**RCC No. 308/2024**
**Evidence/Exh. 32**

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F file Evidence is same word to word as per the original evidence.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | P. N. DURATKAR |
| Court Name | : | 2nd Joint Civil Judge (Jr.Dn.) & JMFC, Akot, Tq. Akot, Dist. Akola |
| Date of decision | : | 23/04/2025. |
| Evidence Signed by P.O on | : | 23/04/2025. |
| Evidence Uploaded on | : | 24/04/2025. |